# Fire Arm Seize

Seizure of fire arms by LCB from Shirud village.



स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या विभागाने धुळे तालुक्यातील शिरूड येथून जप्त केलेल्या शस्त्रांसाची पाहणी करतांना जिल्हा पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील समवेत पोलिस निरीक्षक देविदास शेळके व पोलिस कर्मचारी.

## शिरूड येथे गावठी पिस्तुलासह तलवार जप्त

### पोलिस प्रशासनाची धडक कारवाई

धुळे (प्रतिनिधी) :- धुळे तालुक्यातील शिरूड येथे एका राहत्या घरातून पिस्तूल, तलवार, कोयता जप्त करून या प्रकरणी बाळू काशिराम कोळी वय (३२) याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनी गजाआड केल्याची माहिती पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पोलिस प्रशासनातर्फे शोधकार्य शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच नागरीकांनी अज्ञात व्यक्तिसंदर्भात सावधगीरी बाळगण्याचे आवाहनही जिल्हा पोलिस अधिक्षकांनी यावेळी केले. त्यात खातरजमा करून भाडेकरूंना घर द्यावे, भाडेकरू विषयी पूर्ण माहिती ठेवावी आवश्यकता भासल्यास पोलिसांना द्यावी असे आवाहनही साहेबराव पाटील यांनी केले. काही गुन्हे माहिती तंत्रज्ञान प्रकारात घडून येतात. त्याबाबत दक्षता घेण्यासाठी मोबाईलचे बोगस सिमकार्ड तपासणी सुरू केली आहे. बोगस सिमकार्ड विषयी मोहाडी पोलिसात ४ तर धुळे शहर पोलिसात १ गुन्हा नोंदविण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

शिरूड येथे पकडण्यात आलेल्या शस्त्रसाठ्यात ३३ इंच लांबिची तलवार, कोयता, एक लाकडी बेसबॉलचा दांडा, तीन काडतुसासह दोन गावठी पिस्तुल, दोन रिकाम्या नळकांड्या आदी वस्तु मिळून आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिक्षकांनी दिली.

बाळू कोळी याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक देविदास शेळके, पोलिस उपनिरीक्षक दिलीप माळी, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय पाटील, चुनिलाल सैंदाणे, राजेंद्र सोनवणे, सुनिल देसले, प्रभाकर ब्राह्मणे, देवेंद्रसिंग परदेशी, छोटु बोरसे, संदिप थोरात, वसंत पाटील, मुख्तार शेख, आरिफ शेख, महिला पोलिस कविता देशमुख, वाहन चालक दिपक पाटील यांनी ही कारवाई केली.